Vasundhara Bank
VASUNDHARA MAHILA NAGARI SAHAKARI BANK LTD. AMBAJOGAI

# वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक लि. अंबाजोगाई

# २५ वा वार्षिक अहवाल

आपल्या व्यापार क्षितीजांचा करा विस्तार
**सोबत वसुंधरेचा हातभार...**

विश्वास...
विकास...
नम्रता ...

मुख्यालय : मोंढा रोड, अंबाजोगाई,
फोन नं. ०२४४६-२४३१९९, २४७१२८
Email : admin@vasundharabank.in



भावपूर्ण

# श्रद्धांजली

**अहवाल वर्षात भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, कलावंत, सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, सभासद, हितचिंतक, ज्ञान व अज्ञात व्यक्तींचे निधन झाले त्यांना**

**नम्रतापूर्वक भावपूर्वक श्रद्धांजली**

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !**

जेव्हा लगडून येतील फुले याच्यावरती,
अन् आयुष्याची रेषा होईल हिरवीगार
तेव्हा मी नसेन कदाचित; पण जाणवेल तुम्हास
हा माझाच गन्ध आहे... हा आहे माझाच बहार...

आमचे श्रद्धास्थान तथा
बँकेच्या संस्थापक अध्यक्षा



स्व.डॉ.सौ. विमलताई नंदकिशोरजी मुंदडा

एक इच्छा काही बदलू शकत नाही,
एक निर्णय काही बदलू शकतो,
परंतु एक निश्चय सर्व काही बदलू शकतो...

आधारस्तंभ



श्री. नंदकिशोरजी मुंदडा



श्री. अक्षय नंदकिशोरजी मुंदडा



मा.आ.सौ. नमिताताई अक्षय मुंदडा

२५ वा
# वार्षिक अहवाल

## अध्यक्षांचे मनोगत...



सन्माननीय सभासद भगिनी व बंधू,

आपल्या बँकेच्या २५ व्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये मी स्वतः व संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करते. बँकेच्या संस्थापक अध्यक्षा स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून २५ वर्षांपूर्वी वसुंधरा बँकेची स्थापना झाली. समाजातील लहान-मोठ्या घटकांना, महिला व आर्थिक मागासलेल्या वर्गासाठी बँकेच्या वतीने मदत करू शकेल.

सभासदांच्या गरजा व अपेक्षा पूर्ण करताना त्यांना आर्थिक पाठबळ देण्याकरिता बँक विविध सुविधा देत आहेत. बँकेच्या सी.बी.एस. प्रणाली, आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी., एस.एम.एस. अलर्ट, लॉकर सेवा यासारख्या सुविधा उपलब्ध आहे. तसेच आगामी काळात ए.टी.एम., आय.एम.पी.एस., यु.पी.आय., फास्टटॅग यांसारख्या सेवा लवकरच सुरु होणार आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगती झपाट्याने होत आहे, सर्वोत्तम आचरण, पारदर्शकता व कर्मचाऱ्यांचे कार्य व आपल्या सर्वांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने बँक प्रगतीपथावर आहे.

ग्रामीण भागातील लोकांना पाठबळ देता यावे त्यांनी जमविलेल्या रुपया रुपयाची विश्वासपात्र गुंतवणूक करण्यासाठी संस्था असावी अशी भूमिका समोर ठेवून वसुंधरा बँकेची स्थापना सन १९९४ मध्ये झाली.

वसुंधरा बँक ही सभासदांचे, ठेवीदारांचे तसेच सर्व खातेदारांचे हित जोपासण्यास कटिबद्ध असून सर्व घटकांचा विश्वास तसेच कडक वसुली मोहिम राबविल्यामुळे बँक प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे.

आदर्श व्यवस्थापन, विनम्रता, विश्वास, विकास ही बँकेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आपणा सर्वांचे सहकार्य मिळाले व यापुढेही मिळावे ही आग्रहाची नम्र विनंती.

धन्यवाद...!

आपली नम्र
**अनिता प्रदिपराव ठोंबरे**
अध्यक्षा
वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक लि., अंबाजोगाई

# उपाध्यक्षांचे मनोगत...



सन्माननिय सभासद बंधू-भगिनींनो,

सविनय नमस्कार,

आपल्या बँकेच्या २५ व्या सर्वसाधारण सभेच्या प्रसंगी मी संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांचे मनापासून स्वागत करते. आपणा सर्वांच्या सहकार्याने बँकेची घोडदौड सुरु आहे.

मागील काळाचा मागोवा घेतल्यास, सुरुवातीला आपल्या बँकेच्या संस्थापिका स्व.डॉ.सौ.विमलताई मुंदडा यांनी ज्या उदात्त, स्वच्छ, प्रामाणिक हेतूने, जिद्दीने बँकेची सन १९९४ साली स्थापना केली ते साध्य झाल्याचे प्रकर्षाने जाणवते. एखादी सहकारी बँक काढणे सोपे असते परंतू ती कार्यरत ठेवणे कठीण असते. आपली बँक फक्त कार्यरत नसून ती प्रगतीच्या दिशेने उत्कृष्ट कार्यरत आहे. तसेच उत्कृष्टता हे ध्येय नसून कधीही न संपणारा प्रवास आहे हे आम्ही समजतो.

बँकेच्या सन २०१९-२० या आर्थिक सालातील लेखापरीक्षक यांनी तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व अहवाल सादर करित असताना मला अतिशय आनंद होत आहे. नुकताच आपल्या बँकेने ८३ कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण केला असून पूढच्या वर्षी आपली बँक १०० कोटींचा टप्पा पूर्ण करेल अशी अपेक्षा करते. हे वर्ष बँकेचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे, परंतु कोव्हिड-१९ मुळे बँकेपुढे मोठे आव्हान उभे राहिलेले आहे, या वर्षात आपण कठीण मार्गावर वाटचाल करीत आहोत. आपली बँक अंबाजोगाई व इतर परिसरात सहकारी बँकींगमध्ये सर्वसामान्य ग्राहक, सर्व सभासद, ठेवीदास, हितचिंतक व व्यावसायिक वर्गामध्ये २५ वर्षे विश्वासपूर्ण वाटचाल करीत आहोत. तसेच केज, माजलगाव व बीड या शहरातील शाखेंच्या माध्यमातून तेथील परिसरामध्ये सुद्धा आपण बँकींग सेवा देत आहोत. लवकरच आपले स्वतःचे ए.टी.एम. प्रत्येक शाखेवर बसविण्याचा बँकेचा मानस आहे. डिजीटल बँकींगची समस्यांवर मात करत बँकींग व्यवसाय सुरु आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानावर आधारीत आय.एम.पी.एस., यु.पी.आय., वाहनांसाठी फास्टटॅग यांसारख्या सुविधांसुद्धा लवकरच सुरु करूत. या वाटचालीत रिझर्व्ह बँक व बँकेतील अधिकारी यांचे योग्य मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच संस्थेचे सर्व आजी-माजी संचालक, सभासद, हितचिंतक, कर्मचारी वर्ग, काही ज्ञात-अज्ञात व्यक्ती असा सर्वांचा मोलाचा वाटा आहे. तसेच आमचे प्रेरणास्थान मा.श्री.नंदकिशोरजी मुंदडा, मा.श्री. अक्षयजी मुंदडा, मा.श्री.पुरुषोत्तमजी भन्साळी व मा.सौ.नमिताताई मुंदडा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले हे खास नमूद करावेसे वाटते.

तसेच यासाठी बँकींग क्षेत्रात वाढत जाणारे नवनीवन तंत्रज्ञान, सर्व क्षेत्रातील स्पर्धा, बदलते राजकीय व सहकार क्षेत्रातील समिकरणे, म्युच्युअल फंड व विमा क्षेत्रातील ग्राहकांचा गुंतवणूकीचा वाढता कल इ. बाबी विचारात घेता सहकारी बँकींग क्षेत्रापुढे मोठे आवाहन उभे आहे. अशा सर्व समस्यांवर मात करीत बँकींग व्यवसाय सुरु आहे.

नियोजनबद्ध वसुली यंत्रणा राबवून सतत एन.पी.ए. चे प्रमाण कमीत कमी ठेवण्यात यावर्षीही यश मिळविले आहे. हे सर्व आपणासमोर नमूद करताना मला सार्थ अभिमान वाटतो.

अहवाल सालात जागतिक व अखिल भारतीय कीर्तीचे थोर साहित्यिक, कला, राजकीय, शिक्षण तज्ञ व देश रक्षणासाठी शहीद वीर जवान, पूरग्रस्त तसेच बँकेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, हितचिंतक तसेच ज्ञान-अज्ञात व्यक्ती यांचे निधन झाले त्यांचेसाठी शोक व्यक्त करून त्यांच्या पवित्र आत्म्यास मी श्रद्धांजली अर्पण करते.

वसुंधरा बँक ही आपल्या सर्वांचा परीवार आहे. त्यामुळे आपल्या सर्वांचे ऋणातच मी राहू इच्छिते.

धन्यवाद...

आपली नम्र

**सुनंदा परशुरामजी मुंदडा**

उपाध्यक्षा

वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक लि., अंबाजोगाई

# विद्यमान संचालक मंडळ

२५ वा वार्षिक अहवाल



अनिता प्रदिप ठोंबरे
अध्यक्षा



सुनंदा परशरामजी मुंदडा
उपाध्यक्षा



अल्का अनिल जोशी
संचालिका



पद्मा भिकूलाल भंसाळी
संचालिका



सिंधू बाबासाहेब शेळके
संचालिका



चेतना हरिष खिलोसिया
संचालिका



शुक्ला सुभाषजी बडेरा
संचालिका



शशिकला मुरलीधर नांदे
संचालिका



अश्विनी ज्ञानेश्वर चवरे
संचालिका



अज्ञानबाई अंकुश गोचडे
संचालिका



ज्योती सिद्राम कांबळे
संचालिका



शामला विलासराव सोनवणे
संचालिका



मंजुषा प्रभाकर जोशी
तज्ञ संचालिका



ॲड. आर.डी. कदम
तज्ञ संचालक



दिपक त्र्यंबकराव लंके
मुख्य कार्यकारी अधिकारी

Vasundhara Bank
VASUNDHARA MAHILA NAGARI SAHAKARI BANK LTD. AMBAJOGAI

# विश्वास, विकास, नम्रता
## या तीन सुत्रीवर ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा.

### ठेवीवरील व्याजदर :

| | |
|---|---|
| ७ दिवस ते १ महिना | ०३.००% |
| १ महिना ते ६ महिने | ०५.२५% |
| ७ महिने ते १२ महिने | ०६.२५% |
| १३ महिने ते २४ महिने | ०६.७५% |
| २५ महिने व पूढे | ०६.२५% |



- जेष्ठ नागरीक यांना व्याजदरात ०.५० टक्के जास्त व्याजदर.
- १५ लाख व त्यावरील एक रकमी वैयक्तीक ठेव ठेवणाऱ्या ठेवीदारांना ०.५० टक्के जादा व्याजदर.

| | |
|---|---|
| सोने तारण | 10.00% * |
| पर्सनल लोन | 13.00% * |
| गृह कर्ज | 11.00% * |
| व्यापारी कर्ज | 13.00% * |
| सोने तारण कॅश क्रेडीट | 10.00% * |
| वाहन कर्ज | 12.50% * |

**लॉकर उपलब्ध.**

**लवकरच सुरु होत आहे...**

ATM
UPI
FASTAG

**माफक दरात लॉकरची सुविधा.**
**संपूर्णत: संगणकीकृत बँक.**

### बँकेची वैशिष्ट्ये :

- मुख्यालय व सर्व शाखा संगणकीकृत.
- सेफ डिपॉझिट लॉकर सुविधा.
- आर.टी.जी.एस. / एन.ई.एफ.टी. ची सुविधा.
- प्रमुख विमा कंपन्याच्या सहकार्याने जनरल इन्शुरन्स ची सुविधा.
- ₹५,००,०००/- (पाच लाख) पर्यंतच्या ठेवीवर विमा संरक्षण.
- ठेवीवर अधिकतम व कर्जावर कमीत कमी व्याजदर.

प्रेषक :
**वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक लि. अंबाजोगाई**
मुख्यालय : मोंढा रोड, अंबाजोगाई, फोन नं. ०२४४६-२४३१११, २४७१२८
Email : admin@vasundharabank.in